# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ६ मे २०२५

---

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामध्ये १२ वी नंतर रोजगाराभिमुख अनोखे अभ्यासक्रमांना (प्रमाणपत्र आणि पदवी) येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश देण्यात येणार आहेत.

विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी व व्यवसायक्षम बनवण्याकरीता विद्यापीठातील प्रशाळांमध्ये इयत्ता १२ वी उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने पुढील अनोखे अभ्यासक्रमांना येत्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश देण्यात येत आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेअंतर्गत बी.कॉम.(ऑनर्स), बीएफएसआय हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना बँकींग, फायनान्स व विमा क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध आहेत. लाईफ सायन्सेस प्रशाळेत बी.एस्सी. प्लाईड बायोलॉजी हा अभ्यासक्रम सुरू होत असून हा अभ्यासक्रम कृषी जैव तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया उद्योग, औषधनिर्माण या क्षेत्रामध्ये रोजगाराची संधी मिळू शकते. भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी.(ऑनर्स) ईलेक्ट्रॉनिक्स हा अभ्यासक्रम सुरू असून त्यास डेटा सायन्स्, सौर उर्जा प्रणाली, इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत. संगणकशास्त्र प्रशाळेतील बी.एस्सी.(ऑनर्स) कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान (आयटी), बँकींग, सेवा क्षेत्र, शासकिय कार्यालये, विविध कंपनी यामध्ये रोजगार प्राप्त होऊ शकतो. गणितशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (ऑनर्स), मॅथेमेटीकल सायन्स या अभ्यासक्रम सुरु असून त्यास आयटी क्षेत्र, शासकिय कार्यालये, विमा क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत. कला व मानवविज्ञान प्रशाळेत विविध स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर बी.ए. (ह्युमॅनिटीज-सिव्हील सर्व्हीसेस) हा अभ्यासक्रम सुरु होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एमपीएससी / युपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची संधी या अभ्यासक्रमामुळे मिळू शकते. या अभ्यासक्रमांना प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना एक वर्ष उद्योग व्यवसायात प्रेंटिसशिप करावी लागणार असल्याने त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्राप्त होऊन शासनाच्या धोरणाप्रमाणे मोबदलाही प्राप्त होऊ शकतो.

बी.ए./बी.एस्सी.(लिबरल आर्ट) या अनोख्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याला त्याची आवड असणाऱ्या वेगवेगळया विषयांची निवड करुन शिक्षण घेता येणार आहे. त्यामुळे त्याला आवडत्या क्षेत्रात नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते. सामाजिकशास्त्रे प्रशाळेत विद्यार्थ्यांकरीता बी.ए.(ऑनर्स) सोशल सायन्स हा चार वर्षीय अभ्यासक्रम सुरु झाला असून विद्यार्थ्यास अर्थशास्त्र, इतिहास, संरक्षणशास्त्र, मानसशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेता येऊन त्या क्षेत्रात रोजगाराची संधी प्राप्त होऊ शकते.

तसेच या विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विविध कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑनलाईन पध्दतीने करण्याची संधी देखील देण्यात येत आहे. विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच सर्वांगीण विकासासाठी विविध कला, सांस्कृतीक, साहित्य व क्रिडा या कलागुणांना वाव विविध स्पर्धाद्वारे दिला जात आहे. विद्यापीठ प्रशाळांमध्ये शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासासाठी मुलांचे ३ वसतीगृह, मुलींचे स्वतंत्र ७ वसतीगृहे उपलब्ध आहेत. इच्छूक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद पाटील
कुलसचिव